**तक्रार (यु.एल.पी.) क्र.३२/२०२२.**
**नि. क्र. यु डब्ल्यु – ०१.**

**उलटतपासणी सामनेवालेतर्फे श्री. डी. एस. देसाई, वकील यांचेमार्फत आजरोजी शपथेवर सुरु.**

६) प्रस्तुत तक्रार ही कशासाठी दाखल केली याची मला माहिती आहे म्हणजेच प्रस्तुत तक्रार ऑक्टोबर २०१९ ते ३१/१२/२०२० चा पगार मागण्यासाठी, सन २०१९–२०२० चा बोनस व रजेचा पगार व दिनांक १५/११/२०२१ रोजीचे सामनेवाले यांनी पाठविलेले पत्र रद्द करण्यासाठी दाखल केलेली आहे. वरील कालावधीची पगाराची मागणी व बोनसची मागणी ही पुणे येथे काम केलेले असल्यामुळे मागणी केलेली आहे. जानेवारी २०२१ पासुन मी काही काळासाठी घरीच होतो व त्यानंतर नोकरी करीत आहे.

७) मी पुणे येथे दिनांक ०१/१०/२०१९ ते ३१/१२/२०२० या कालावधीत काम करीत होतो. मी सामनेवाले यांच्याकडे सुरूवातीस सन २००० सालामध्ये लिपीक म्हणून नोकरीस लागलो. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाले ही आस्थापना ट्रान्सपोर्ट व सी.एन.एफ. एजंट म्हणून काम करते. मी जेंव्हा नोकरीस लागलो त्यावेळी मला पी.एफ. मिळत होता. मला दरवर्षी

पी.एफ. ऑफीसकडुन पावती मिळत होती. हे म्हणणे खरे नाही की, पी.एफ. ची रक्कम मी सन २०१४ साली काढुन घेतली. आजरोजी माझा पी.एफ. चा नंबर अस्तित्वात आहे तो मी न्यायालयात हजर करू शकतो.

८) हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर २०१४ मध्ये मी पुण्याला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, पुणे ऑफीसमध्ये मी इनचार्ज म्हणुन काम करीत होतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी ट्रान्सपोर्ट प्लानर म्हणुन काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रॉव्हीडंट फंड पुणे येथे काम करीत असताना वेगळ्या नंबरने भरला जायचा. हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथील कार्यालय दिनांक ३१/१०/२०१८ रोजी बंद झाले. हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथील कार्यालय बंद झाल्याने तेथील कर्मचाऱ्यांचा हिशोब सामनेवाले यांनी पुर्ण केला. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१/१०/२०१८ रोजी पुणे येथील कार्यालय बंद झाल्यानंतर मी महालक्ष्मी एंटरप्रायझेस करीता ट्रान्स्पोर्ट एजंट म्हणुन काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/१०/२०१८ पासुन मी सामनेवाले यांच्याकडे काम करीत असल्याबाबतचा पुरावा या कामामध्ये दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१/११/२०१८ पासुन माझ्यामध्ये व सामनेवाले

यांच्यामध्ये मालक – नोकर नाते अस्तित्वात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ पासुन मी पुणे येथेच काम करतो. सध्या मी पुणे येथे वास्तव्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.०३ व ०४ मध्ये नमूद केलेल्या मजकुराबाबत या कामी पुरावा दाखल नाही. हे मला माहित नाही की, महालक्ष्मी एंटरप्रायझेस भागीदारी संस्था आहे अथवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोल्हापूरमध्ये सामनेवाले यांचे हेड ऑफीस असलेबाबत कोणताही पुरावा याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी नेमणुक पुणे येथे केली होती. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मला सामनेवाले यांनी पुणे येथे कामासाठी पाठविलेले होते. माझे वेतन पुणे कार्यालयामधुनच मिळायचे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुण्यामध्ये नोकरी निमित्त कार्यरत असल्यामुळे कोल्हापूर येथे दावा दाखल करू शकत नाही. त्यामुळे मी केलेले प्रतिज्ञापत्र चुकीचे आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत,**

**सही/–**

**कोल्हापूर.** (श्री. एस. डी. सुर्यवंशी)

दिनांक :– १७/०१/२०२५. सदस्य,

औद्योगिक न्यायालय क्र.०२, कोल्हापूर.